Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-III MARCH 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

महिलांच्या सशक्तीकरणामध्ये महिला बचत गटाचे योगदान

डॉ. सौ. प्रभा चिंचखेडे
सहय्यक अधिव्याख्याता,गृहअर्थशास्त्र विभाग
सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.

सारांश :

महिलांना आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय ख-या अर्थाने त्या सबला होवू शकत नाही याच उद्देशाने स्वयंसहाय्य गटाचे महिला सशक्तीकरणात योगदान या विषयाचे अध्ययन केले. महिलांचे शिक्षण व वयाचा देखील परिणाम त्यांच्या व्यवसायावर होतांना दिसून येतो. बचत गटाचा कालावधी हे देखील यशस्वतीतेवर परिणाम करणारे एक माध्यम आहे.

प्रस्तावना :

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे अधिकतर जनता ही ग्रामीण भागात राहते. भारताचा विकास करावयाचा असल्यास आपल्याला ग्रामीण भागातूनच सुरुवात करावी लागेल. कुटुंबाचा विकास म्हणजे समाजाचा विकास समाजाचा विकास होईल तर राज्याचा व नंतर देशाचा विकास होईल. याकरीता प्रथम कुटुंबांचा विकास करावा लागेल. भारतीय संस्कृती कुटुंब प्रधान आहे. या कौटुंबिक रथाला दोन चाके असतात ती म्हणजे स्त्री व पुरुष होय. आपल्याकडे असणारी पुरुष प्रधान संस्कृती त्यामुळे स्त्रीयांचे क्षेत्र तसे मर्यादीतच होते. ते म्हणजे चुल आणि मुल सांभाळणे होय. औद्योगिक क्रांतीमुळे आज जग जवळ झाले आहे. वाहतुक व दळण वळणाची साधने वाढल्यामुळे व्यापार क्षेत्रात देखील प्रगती झालेली दिसून येते. तरी देखील भारत हा विकसनशील देश म्हणूनच ओळखला जातो. देशाची ही ओखळ जर आपणाला बदलवायची असेल तर आपल्याला कुटुंबापासूनच सुरुवात करावी लागेल.

पुरुष आणि स्त्री यांच्या भूमिकांमध्ये बदल होत आहेत. ही प्रक्रिया गेल्या कितीतरी वर्षापासून चालू आहे. पण आता फक्त घरकामात मदत इतपत पुरुषांची भूमिका न राहता स्त्रीने आर्थिक भार उचलून पुरुषांसाठी घरचा फ्रण्ट मोकळां करावा असंही नव्याने बाबा झालेल्या किंवा लग्नोत्सुक तरुणांना वाटत आहे हे महत्वांच आहे. सोशल नेटवर्किंग साईट्सच्या जगामध्ये सहज फेरफटका मारला तर अशाप्रकारे घराची जबाबदारी उचलणारे बाबा कितीतरी भेटतात.

आजच्या स्पर्धात्मक, गतिशील, गुंतागुंतीच्या, ताणतणावाच्या जगात वावरतांना अपण सारेच कमी अधिक प्रमाणात धास्तावलेले आहोत. एकीकडून ज्ञानाचा प्रचंड विस्पोट होतोय तर दुसरीकडे वाढती लोकसंख्या, वाढते प्रदुषण, महागाई, अस्थिर परिस्थिती, खदखदता विद्रोह या सर्व कारणांमुळे जनजीवन गुंतागुंतीचे होत चालले आहे. नवेनवे वैज्ञानिक शोध वेगवान प्रचंड ताकदीची यंत्रसामग्री यामुळे भोवळ यावी अशी आगेकुच जणु चक्रीशर्यत चालू आहे. या चक्रीवादळातुन कुटुंब देखील सुटले नाही. त्यामुळेच आज महिलांना मिळालेली शिक्षणाची संधी व काहीप्रमाणात मोकळे वातावरण यामुळे स्त्रीयांमधील सुप्त गुण आज जगासमोर येतांना दिसतात. परंतु ही स्थिती मात्र महानगर व शहरांपर्यत सिमीत आहे. ग्रामीण स्त्रीयां मात्र शिक्षण, प्रेरणा व आत्मविश्वासा अभावी आजही फारशा प्रगत झालेल्या दिसून येत नाही. याची जाणीव जेव्हा सरकारला झाली तेव्हा महिलांच्या विकासाकरीता त्यांना नुसती शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली तरी त्या सक्षम होणार नाही याकरीता त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे गरजेचे आहे ही बाब लक्षात येताच आज सरकारने विविध योजना स्त्रियांकरीता सुरु केलेल्या दिसून येतात. त्यातीलच एक मार्ग म्हणजे महिला बचत गट होय.

महिला आर्थिकदृष्टया सक्षम नसल्याने त्यांना अपेक्षित सन्मान मिळत नाही त्यांना आर्थिक सक्षम बनविण्यासाठीच बचत गटाची चळवळ सुरु केली आहे. महिलांना कुणाचे उधारी ठेवणे जमत नाही. कर्ज घेतल्यानंतरही कर्ज फेड करण्यात

महिलाच पुढे असल्याने त्यांच्यासाठी सुमतीबाई सुकळीकर योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत महिला बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज हदले जात असमन बचतगटांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

टी. एफ. थकेकरा २००२ – परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वच्छेने, सहमतीने, सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेला प्रवास म्हणजे 'स्वयसहाय्य बचत गट' होय.

एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या ओवीप्रमाणे एक पेक्षा अधिक स्त्रिया एकत्र येवून स्वावलंबी होण्याचा प्रयत्न या बचत गटाद्वारे करण्याचा प्रयत्न स्त्रिया करीत आहेत.

उद्दीष्टये :

१. स्वयंसहाय्य गटातील यशस्वीतेवर शिक्षणाचा काही परिणाम होतो का हे अभ्यासणे.
२. स्वयंसहाय्य गटातील यशस्वीतेवर स्त्रीयांच्या वयोगटाचा काही परिणाम होतो का हे अभ्यासणे.

गृहीतके :

१. स्वयंसहाय्य गटातील यशस्वतीतेवर शिक्षणाचा परिणाम होतो.
२. स्वयंसहाय्य गटातील यशस्वतीतेवर स्त्रीयांच्या वयोगटाचा परिणाम होतो.

संशोधन पध्दतीः

प्रस्तुत महिला सशक्तीकरणांमध्ये महिला बचत बट किंवा स्वयंसहाय्य गटाचे योगदान या विषयाचे अध्ययन करण्याकरीता नमुना ५० ग्रामीण स्त्रियां ज्या बचत गटाच्या सदस्य आहेत व स्वयंरोजगार करीत आहेत अशा स्त्रीयांचा समावेश केलेला आहे. अध्ययनाकरीता माहिती जाणून घेण्याकरीता स्वरचित २० प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाला होय किंवा नाही असे पर्याय दिलेले होते. होकारार्थी उत्तराकरीता १ गुण व नकारार्थी उत्तराकरीता ० गुण याप्रमाणे गुणांकन करण्यात आले. सांख्यीकिय विश्लेषणाकरीता मध्यमान, प्रमापविचलन व टी मुल्य काढण्यात आलेले आहे.

मर्यादा :

प्रस्तुत अध्ययनाकरीता नागपूर जवळील बहादुरा व विहीरगाव अशा दोन ग्रामीण भागातील बचत गटातील स्त्रीयांचाच समावेश केलेला आहे.

सांख्यिकिय विश्लेषण :

महिला सशक्तीकरणाकरीता सर्वात प्रमुख साधन म्हणजे आर्थिक पाठबळ होय. या उद्देशाने महिलांना स्वतःच्या पायावर उभे करणे गरजेचे आहे. तेव्हाच त्यांना विचार व निर्णय स्वातंत्र्य मिळू शकते. म्हणून त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे याच उद्देशाने सरकारने महिला बचत गटाची संकल्पना मांडलेली आहे. प्रस्तुत सारणीमध्ये महिलांचे शिक्षण व त्यांच्या स्वयंसहाय्य गटाचे यश यांवर काही परिणाम होतो काय हे अभ्यासण्यात आले त्यानुसार जे प्राप्तांक मिळाले त्यानुसार खालील प्रमाणे सांख्यिकिय विश्लेषण करण्यात आले.

गृहीतके :-

१. स्वयंसहाय्य गटातील यशस्वतीतेवर शिक्षणाचा परिणाम होतो.

सारणी क्र. १ –

विवरण	एकुण संख्या	मध्यमान	प्रमाप विचलन	टी मुल्य
१ ते १२ वर्ग	५५	६.९४	२.७८	१.१७
१२ वर्गाच्या पुढे	४५	६.६	२.०३	

वरील सारणीद्वारे असे दिसून येते की, वर्ग १२च्या पुढे ज्या स्त्रियांचे शिक्षण आहे अशा स्त्रियां अधिक प्रमाणात यशस्वीपणे स्वयंसहाय्य गट चालवित आहेत याचाच अर्थ असा की, शिक्षणाचा स्वयंसहाय्य गटाच्या यशस्वितेवर परिणाम होतांना दिसून येतो. अर्थात गृहीतक क्र. १ हे मान्य आहे.

२. स्वयंसहाय्य गटातील यशस्वतीतेवर स्त्रीयांच्या वयोगटाचा परिणाम होतो.

स्वयंसहाय्य गटात समाविष्ट होण्याकरीता किमान वयोमर्यादा १८ वर्ष असली तरीही प्रामुख्याने सर्वेक्षणाअंतर्गत असे दिसून आले की, स्त्रीया या विवाहानंतर काही वर्षे लोटून गेल्यानंतर काही तरी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त स्त्रीया या वय वर्षे २५ व त्यांवरील आढळून आलेल्या आहेत त्यानुसार सारणी.

सारणी क्र. २ –

वयोगट	एकुण संख्या	मध्यमान	प्रमाप विचलन	टी मुल्य
२५ ते ३५ वर्ष	५०	६.१६	३.३९	१.२६
३६ ते ४५ वर्ष	४५	७.५०	२.५९	

प्रस्तुत सारणीद्वारे असे लक्षात येते की, ज्या स्त्रीयांचे वय जास्त आहे त्यांच्या बचत गटाचे यश ज्या स्त्रियांचे वय कमी आहे अशा महिलांच्या बचत गटाच्या यशापेक्षा अधिक आहे. म्हणजेच गृहितक क्र. २ हे देखील मान्य आहे.

निष्कर्ष :

एकापेक्षा अधिक महिला एकत्र येवून स्वतःच्या बचतीमधून काही व्यवसाय करतात किंवा एकमेकांना व्यवसाय करण्याकरीता कर्ज उपलब्ध करुन देतात तेव्हा स्वयंसहाय्य गटाला यशस्विता प्राप्त होते. महिला सशक्तीकरणामध्ये स्वयंसहाय्य बचत गटाचे योगदान फार मोठया प्रमाणात आहे.

सारणी क्र. १ मध्ये स्त्रीयांचे शिक्षण व स्वयंसहाय्य गटाची यशस्वीता याचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, ज्या स्त्रीयांचे शिक्षण १२वी पेक्षा अधिक आहे अशा स्त्रीया ज्या समुहात कार्य करीत आहे त्यांचे गट अधिक यशस्वी होतांना दिसून येते कारण शिक्षणामुळे नवे नवे मार्गांची जाणीव होते. निरनिराळया सरकारी योजना त्यांना माहिती करुन घेता येतात त्याचप्रमाणे आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात तांत्रिक साधनांचा वापर करुन व्यवसाय दूरवर पोहचविता येतो. नुकत्याच वर्धा येथील लोणी या गावातील स्वयंसहाय्य गटातील महिलांना सुरु केलेला बल्ब निर्मितीचा व्यवसाय हे त्याचे सुंदर उदाहरण आहे. शिक्षण कमी असेल तर बचत गट जुन्याच वस्तुंची म्हणजे फक्त पारंपारिक वस्तुंचेच उत्पादन दिसून येते. त्याचप्रमाणे शिक्षण अधिक असेल तर संवेष्टन, विपणन याचे नवे मार्ग सहज सुचतात त्याचा देखील व्यवसायत फायदा होतांना दिसून येतो.

सारणी क्र. २– स्वयंसहाय्य गटातील यशस्वतीतेवर स्त्रीयांच्या वयोगटाचादेखील परिणाम होतांना दिसून येतो. ज्या स्त्रीयांचे वय वर्ष २५ ते ३५ या दरम्यान आहे या स्त्रियांचे निर्णय घेण्याची क्षमता अधिक आहे परंतु त्यांचा अनुभव कमी असल्याकारणांने त्या धडाडीचे निर्णय घेवू इच्छित नाही. उत्साह अधिक आहे परंतु त्यांची वैचारिक शक्ती कमी पडतांना दिसून येते. प्रस्तुत सर्वेक्षणामध्ये असे दिसून आले की ज्यांचे वय अधिक आहे अशा गटाला सुरुवात होवून अधिक कालावधी झालेला आहे हे देखील एक कारण आहे त्यांच्या स्वयंसहाय्य गटाच्या यशस्वीतेचे.

शिफारस व सूचनाः–

महिलांच्या सशक्तीकरणांमध्ये स्वयंसहाय्य गटाची भूमिका फार मोलाची आहे.हे लक्षात घेता सरकारने नवनविन योजना स्त्रियांकरीता सुरु केलेल्या आहेत. वेगवेगळया स्तरावर त्यांना प्रशिक्षण देवून कर्ज व्यवस्था उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.परंतु आजही स्त्रिया या योजनांच्या लाभापासून वंचीत आहेत याकरीता माध्यमिक स्तरातील शिक्षणापासून त्यांना जर या सर्व योजनांचे ज्ञान दिले तर त्याचा लाभ त्यांच्या पालकांना व त्यांना देखील होईल.बचत गटातील महिलांना कर्ज

व्यवस्था असल्याकारणाने ब-याच गटातील स्त्रीयांच्या नावे कर्ज उचलल्या गेलेले असून त्यांना त्याची पुसटशीही कल्पना नसते. याकरीता बचत गटाच्या सदस्यांचे किमान शिक्षणाची अट देखील असणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१. महिला कल्याण आणि विकास विद्या प्रकाशन, प्रा. सौ. माधवी कवी
२. माविम सहयोगिनी मार्गदर्शक पुस्तिका महिला आर्थिक विकास महामंडळ, टी. एफ. थकेकरा
३. सामुदायिक विकास योजना ग्रामीण समाजशास्त्र, प्रा. दिनेशचंद्र
४. महिलांच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य प्रा. लवंगारे

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com